गुलमोहर हस्तलिखित द्वैमासिक
मार्च व एप्रील 2023

नमस्कार,

आज आपल्या गुलमोहर हस्तलिखिताचा मार्च व एप्रील 2023 चा द्वैमासिक अंक प्रकाशित होत आहे. एकीकडे उन्हाचा कडाका आहे तर दुसरीकडे हापूस आंब्याच्या मधुर रसाची चव जिभेवर रेंगाळत आहे. अशाच मधुर रसाने ओतप्रोत असे साहित्य आपल्याला ह्या अंकात वाचायला मिळणार आहे. आपले सर्व नियमित लेखन करणारे साहित्यिक तर आहेतच पण बरेच नविन प्रज्ञावंत साहित्यिक आपल्या मध्ये सहभागी होत आहे. ही अतिशय आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. ह्या अंकाची बांधणी करणे, त्याला सजविणे व उजिरळ स्वरुपात प्रस्तुत करणे ही सर्व महत्वाची कामगिरी तेजस लिमये अनेक दिवसापासू समर्थपणे, सांभाळत आहेत. हे कार्यतत्परतेचे बीज, ही प्रेरणा आम्हाला श्री. उपाध्ये काका व अरविंद लिमये काकांनी आम्हाला दिलेली आहे. त्यांचे मार्गदर्शन बहुमोल आहे. आपल्या सुबक हस्ताक्षराने श्री प्रकाश देशपांडे यांनी अंक सुशोभित केला आहे. सर्व साहित्यिक, वाचक बंधु भगिनींचे आम्ही मनःपूर्वक ऋणी आहोत.

धन्यवाद

संपर्कासाठी :-

1) श्री अरविंद लिमये - 9146025724
2) श्री. किशोर जोशी - 7720092620
3) श्री. तेजस लिमये - 9637418458
4) सौ. विजयाताई जोशी - 8308694751
5) सौ. शोभाताई पांडे - 7769889638
6) वृंदावन वाचनालय -